क्रमांक : जमीन-२६९०/प्र.क्र.२६९४-ज-३

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २१ फेब्रुवारी १९९१.

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
स.नं. १३६ मौजे घाटकोपर पैकी
झाडे लावण्यासाठी अनुज्ञप्ति तत्वावर हिरानंदानी
कंन्स्ट्रक्शन्स प्रा.लि. यांना देण्याबाबत.

ज्ञापन :

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी विभागीय आयुक्तांमार्फत सादर केलेल्या क्रमांक सी/कार्यासन-२/जमीन-३-जे/का.वि.५८४/९०, दिनांक १७-९-१९९० च्या अहवालासंदर्भात त्यांना विज्ञप्तिपूर्वक कळविण्यात येते की, मौजे घाटकोपर येथील सर्वे नंबर १३६ पैकी टेकडीवरील सुमारे १०० एकर जमीन झाडे लावून त्यांची जोपासना करण्यासाठी मे. हिरानंदानी कंन्स्ट्रक्शन्स प्रा.लि. यांना अनुज्ञप्ति तत्वावर व खालील अटी व शर्तींवर देण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

[१] अनुज्ञप्ति तत्वावर दिलेल्या या जमिनीची मालकी सर्वस्वी शासनाची राहील व शासनास जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा ती जमीन शासनाकडे सुपूर्द करण्याचे बंधन ट्रस्टवर राहील.

[२] या "ना विकास क्षेत्रातील" जमिनीचा वापर केवळ झाडे लावून त्यांची जोपासना करण्यासाठीच करावा व अन्य प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करु नये.

[३] या जागी लावण्यात यावयाची झाडे येथील वातावरणात व जमिनीत जगू व वाढू शकतील अशी असावीत व त्यासाठी संबंधित वन अधिकाऱ्याचा सल्ला अनुज्ञप्ति धारकाने घ्यावा.

[४] अनधिकृत अतिक्रमणांपासून या जमिनीचे संरक्षण करण्याची जबाबदारी अनुज्ञप्तिधारकावर राहील.

[५] प्रश्नाधीन जागेत झाडे लावून ती सुशोभित करतांना या जमिनीच्या प्रदेश वर्णनात [टोपोग्राफी] कोणताही फेरबदल अनुज्ञप्तिधारकांनी करता कामा नये.

[६] या अनुज्ञप्तिद्वारे प्रश्नाधीन जमिनीवर ये जा करण्याची तसेच हिंडण्या फिरण्याची परवानगी अनुज्ञप्तीधारकांस राहील मात्र त्यामुळे त्यांना कोणत्याही सुविधाधिकार [इझमेंट राईट] प्राप्त होणार नाही.

[७] सदर जमीन पांच वर्षे मुदतीच्या लिव्ह आणि लायसन्स तत्वावर देण्यात येईल.

[८] जमिनीवर किंवा जमिनीवर लावण्यात येणाऱ्या झाडांवर त्याचे उत्पन्नावर अनुज्ञप्तिधारकांचा कोणत्याही तऱ्हेचा मालकी हक्क राहणार नाही. त्याबद्दल त्यांनी रु.५/- च्या स्टॅम्प पेपरवर शासनास हमीपत्र लिहून दिले पाहिजे.

D.[illegible]
28/2/91

-२-

९] जमिनीवर व जमिनीवर लावण्यांत येणाऱ्या झाडांवर शासनाचाच मालकी हक्क राहील व कोणत्याही वेळी जमिनीची अगर झाडांची शासनाने विल्हेवाट लावल्यास त्याबद्दल किंवा जमिनीवर केलेल्या विकासाबद्दल अनुज्ञप्तिधारकास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

१०] जमिनीचा करावा लागणारा विकास, झाडे लावण्याबद्दल होणारा खर्च हा अनुज्ञप्तिधारकाने स्वतः केला पाहिजे आणि त्याबाबत शासनाकडून कोणतीही मदत दिली जाणार नाही.

११] जमिनीचा उपयोग फक्त झाडे लावण्यासाठीच केला पाहिजे,अनुज्ञप्तिधारकाने इतर कोणत्याही कारणांसाठी जमिनीचा उपयोग करु नये.

१२] जमिनीवर लावलेल्या झाडांपासून जे काही फळाफुलांचे उत्पन्न मिळेल ते शासनाचे मालकीचे राहिले आणि त्याचे उत्पन्न हिशेबासह शासन जमा करण्यात आले पाहिजे.

१३] सदर जमिनीवरुन जाणे येण्याचा वहिवाटीचा रस्ता असल्यास अर्जदाराने तो बंद करता कामा नये.

१४] अनुज्ञप्तिधारकाने जमिनीवर कोणत्याही प्रकारचे विटा दगडाचे किंवा माती लोखंडा/लाकडाचे कायम किंवा तात्पुरते बांधकाम करु नये.

१५] जमिनीवर झाडे लावण्यापूर्वी अनुज्ञप्तीधारकाने जमिनीच्यानकाशासहीत व कोणती झाडे लावणार त्याच्या प्रस्तावासहीत वन खात्याची व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांची अगाऊ परवानगी घेतली पाहिजे.

१६] झाडे लावल्यापासून त्यांची पूर्ण वाढ होईपर्यंत झाडांची काळजी व निगा राखण्याची जबाबदारी अनुज्ञप्तीधारकाची राहिल.

१७] अनुज्ञप्तीधारकाने सदर जमिनीचा तळपृष्ठ निर्देशांक त्याच्या स्वतःचे कोणत्याही जागेवर वापरता कामा नये.

१८] अनुज्ञप्तीधारक यांची जमीन सदर जमिनीस लागून असल्यास तो संबंधीत नगर भूमापन अधिकारी क्रमांक ७ यांचे उपस्थितीत सिमांकित करुन घ्यावी व त्यावर भिंत बांधावी आणि शासकीय जमिनीवर अतिक्रमण करु नये तसेच शासकीय जमिनीवर वहिवाटीचेरस्ते असल्यास त्यामध्ये अडथळे करु नये.

१९] अनुज्ञप्तीधारकाने जमिनीवर झाडे लावण्याबाबतचे हक्क जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या अगाऊ परवानगीशिवाय इतरकोणालाही तबदील करता कामा नये.

२. अनुज्ञप्ती तत्वावर देण्यात आलेल्या जमिनीच्या अधिकार अभिलेखात "इतर हक्क" स्तंभात या अनुज्ञप्तीची नोंद घेण्यात यावी.

३. प्रश्नाधीन जमीन अनुज्ञप्ती तत्वावर देण्यात येत असून त्यासाठी भाडे आकारण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[जयंत दिवाण]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
बी.एम.आर.डी.ए. इमारत, वांद्रे मुंबई-४०० ०५१.

प्रतिलिपी माहितीसाठी अग्रेषित :

१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२] नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३] वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४] विभागीय वन अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.
५] निवड नस्ती.

(५५)

क्र. सो/कार्या-२/२.३/३२/ई.८४
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे
कार्यालय, बी. एम. आर. डी. ए. इमारत,
२ रा मजला, बांद्रे [पूर्व] मुंबई ४०००५१
दिनांक:- २५-५-९३

वाचले:

१] शासन, महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. जमिन-२६९०/प्र.क्र.२६९४/ ज.३ दि. २१.२.९१.

२] मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांनी सादर केलेले दि. १३.३.९१ चे हमीपत्र.

आदेश

मौजे घाटकोपर सर्वे नंबर १३६ पैकी या टेकडी वरील सुमारे १०० एकर जमीन झाडे लावून त्याची जोपासना करण्यासाठी मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांना अनुज्ञप्ति तत्वावर व खालील अटी व शर्तींवर मान्यता देण्यांत येत आहे.

१] अनुज्ञप्ति तत्वावर दिलेल्या या जमिनीची मालकी सर्वस्वी शासनाची राहिल व शासनास जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा ती जमीन शासनाकडे सुपूर्द करण्याचे बंधन ट्रस्टवर राहिल.

२] या "ना विकास क्षेत्रातील" जमिनीचा वापर केवळ झाडे लावून त्याची जोपासना करण्यासाठीच करावा व अन्य प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करता येणार नाही.

३] या बागेत लावण्यात यावयाची झाडे येथील वातावरणात व जमिनीत जगू व वाढू शकतील अशी असावीत व त्यासाठी संबंधीत वन अधिका-यांचा सल्ला अनुज्ञप्ति धारकाने घ्यावा.

४] अनधिकृत अतिक्रमणापासून या जमिनीचे संरक्षण करण्याची जबाबदारी अनुज्ञप्ति धारकाची राहिल.

५] प्रश्नाधीन बागेत झाडे लावून ती सुशोभित करताना या जमिनीच्या प्रदेश वर्णनात [टोपोग्राफी] कोणताही फेरबदल अनुज्ञप्तिधारक यांस करता येणार नाही.

६] या अनुज्ञप्तिद्वारे प्रश्नाधीन जमिनीवर ये जा करण्याची तसेच हिंडण्याची फिरण्याची परवानगी अनुज्ञप्ति धारकांस राहिल मात्र त्यामुळे त्यांना कोणताही सुविधाधिकार [इझमेंट राईट] प्राप्त होणार नाही.

७] सदर जमीन पाच वर्षे मुदतीच्या लिव्ह आणि लायसन्स तत्वावर देण्यात येत आहे.

८] जमिनीवर किंवा जमिनीवर लावण्यांत येणाऱ्या झाडांवर त्याचे उत्पन्नावर अनुज्ञप्ति धारकांचा कोणत्याही तऱ्हेचा मालकी हक्क रहाणार नाही.

९] जमिनीवर लावण्यांत येणाऱ्या झाडांवर शासनाचाच मालकी हक्क राहिल व कोणत्याही वेळी जमिनीची अगर झाडांची शासनाने ~~किंवा~~ विल्हेवाट लावल्यास त्याबद्दल किंवा जमिनीवर केलेल्या विकासाबद्दल अनुज्ञप्ति-धारकास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

१०] जमिनीचा करावा लागणारा विकास, झाडे लावण्याबद्दल होणारा खर्च हा अनुज्ञप्ति धारकाने स्वतः केला पाहिजे आणि त्याबाबत शासनाकडून कोणतीही मदत दिली जाणार नाही.

११] जमिनीचा उपयोग फक्त झाडे लावण्यासाठीच केला पाहिजे. अनुज्ञप्ति धारकाने इतर कोणत्याही कामासाठी जमिनीचा उपयोग करू नये.

१२] जमिनीवर लावलेल्या झाडांपासून जे काही फळाफुलाचे उत्पन्न मिळेल ते शासनाच्या मालकीचे राहिल आणि त्याचे उत्पन्न लिलावाद्वारे शासन जमा करण्यांत आले पाहिजे.

१३] सदर जमिनीवरून जाणे-येण्याचा वहिवाटीचा रस्ता असल्यास अर्जदाराने तो बंद करता कामा नये.

१४] अनुज्ञप्ति धारकाने जमिनीवर कोणत्याही प्रकारचे विटा-दगडाचे किंवा माती, लोखंडा/लाकडाचे कायम किंवा तात्पुरते बांधकाम करू नये.

१५] जमिनीवर झाडे लावण्यापूर्वी अनुज्ञप्ति धारकाने जमिनीच्या नकाशांत कोणती झाडे लावणार हे दाखवून त्यांच्या प्रस्तावाबाबत वन खात्याची तसेच जिल्हाधिकारी यांनी आगाऊ परवानगी घेतली पाहिजे.

१६] झाडे लावल्यापासून त्यांची पूर्ण वाढ होईपर्यन्त झाडांची काळजी व निगा राखण्याची जबाबदारी अनुज्ञप्तिधारकाची राहिल.

१७] अनुज्ञप्ति धारकाने सदर जमिनीचा तळपृष्ठ निर्देशांक त्यांच्या स्वतःचे कोणत्याही जागेवर वापरता कामा नये.

१८] अनुज्ञप्तिधारक यांची जमीन सदर जमिनीस लागून असल्यास ती संबंधीत नगर भूमापन अधिकारी क्र.७ यांचे उपस्थितीत सिमांकन करून घ्यावी व त्यावर भिंत बांधावी आणि शासकीय जमिनीवर अतिक्रमण करू नये तसेच शासकीय जमिनीवर वहिवाटीचे रस्ते असल्यास त्यामध्ये अडथळे करू नये.

(७०९) (५८)

१९] अनुज्ञप्ति धारकाने जमिनीवर झाडे लावण्याबाबतचे हक्क जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांच्या आगाऊ परवानगी शिवाय इतर कोणासही तबदील करता कामा नये.

२/- अनुज्ञप्ति तत्वावर देण्यात आलेल्या जमिनीच्या अधिकार अभिलेखात "इतर हक्क"स्तंभात या अनुज्ञप्तिची नोंद घेण्यात यावी.

३. प्रश्नांकीत जमीन अनुज्ञप्ति तत्वावर देण्यात येत असून त्यासाठी भाडे आकारण्याची आवश्यकता नाही.

सही/xxx
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता.

प्रति,

~~श्री.~~ मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा. लि.
१७.डी. सरस्वती रोड,
सांताक्रूझ [पश्चिम]मुंबई ४०००५४

प्रत: १] जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख तथा नगर भूमापन अधिकारी क्र. ७ यांजकडे माहितीसाठी रवाना.
२. प्रश्नांकीत जमिनीचा ताबा अनुज्ञप्ती धारकास देऊन त्याबाबतची ताबेपावती व नकाशा [दोन प्रतीमध्ये] अहवालासह सादर करावा.
२] तहसिलदार कुर्ला यांजकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
२. प्रश्नांकीत जमिनीचा ताबा अनुज्ञप्ति धारकास देऊन तसेच संबंधीत अधिकार अभिलेखात योग्य ती नोंद घेऊन याबाबतचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
३] मा. आयुक्त, कोकण विभाग यांजकडे माहितीसाठी सादर.
४] सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे माहितीसाठी सादर.

सही/xx
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.

सत्यप्रत:

जिल्हाधिकारी, मुं.उ. जिल्हाकरिता

2२७

क्रमांक:जमीन-२६९०/प्र.क्र. २६९४/ज३.

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: २४ जानेवारी १९९५

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांना
स. नं. १३६ मौजे घाटकोपर पैकी
झाडे लावण्यासाठी अनुज्ञप्ती तत्वावर दिलेल्या
शासकीय जमिनीमधून रस्ता करण्यास परवानगी
देणेबाबत -

ज्ञापन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी सादर केलेल्या क्र. सि/ कार्या-२/अ/ई-८८, दिनांक ११. १०. १९९३ व दिनांक १५. २. १९९४ च्या पत्रांस अनुलक्षून त्यांना विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मौजे घाटकोपर येथील स. नं. १३६ पैकी टेकडीवरील सुमारे १०० एकर जमीन झाडे लावून त्यांची जोपासना करण्यासाठी मे. हिरानंदानी कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांना शासन ज्ञापन, समक्रमांक दिनांक २१. २. १९९१ अन्वये अनुज्ञप्ती तत्वावर ५ वर्षांसाठी मंजूर केलेली आहे. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, हा लिव्ह आणि लायसन्सचा ~~कालावधी हे ज्ञापन निर्गमित~~ झाल्याच्या दिनांकापासून १० वर्षांपर्यन्त वाढवून देण्यात यावा. तसेच कंपनीला खालील अटी व शर्तींवर त्या जमिनीतून कच्चा रस्ता बांधण्यास परवानगी द्यावी.

[१] कच्च्या रस्त्याची लांबी १८४८ मी. व रुंदी ५ मीटर राहील. हा कच्चा रस्ता कंपनी स्वखर्चाने तयार करील व कंपनी शासनाकडे कोणत्याही खर्चाची भरपाई मागणार नाही.

[२] या रस्त्याचा मालकी हक्क शासनाकडे राहील.

[३] प्रश्नाधीन कच्च्या रस्त्याच्या बांधकामाखालील जमिनीचा टोडीआर कंपनीस मिळणार नाही.

२. शासनाच्या समक्रमांकाच्या दि. २१. २. १९९१ च्या ज्ञापनातील इतर अटी/शर्ती यापुढेही लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[वि. वि. आल्हाट]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

३१/११/९५

प्रति,